ठामपा/निवि/अति.आयुक्त - ६९४
दिनांक :- २१ / १२ / २०१६

# ठाणे महानगरपालिका, ठाणे

## सार्वत्रिक निवडणूक २०१७

# विशेष नोटीस

**महानगरपालिकेचे देय असणारे सर्व कर / चार्जेस / फी इ. पोटी अदा न केलेली रक्कम असणारे मिळकतधारक / नागरीक यांचेकरिता**

ठाणे महानगरपालिकेची आगामी सार्वत्रिक निवडणूक २०१७ ही साधारणपणे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये अपेक्षित आहे.

या निवडणूकीच्या अनुषंगाने, ठाणे महानगरपालिकेला विविध कर / चार्जेस / फी इत्यादी पोटी देय रक्कम थकीत असणाऱ्या मिळकतधारक / नागरीक यांना या विशेष नोटीसीद्वारे सूचित करण्यात येत आहे की, ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०१७ मध्ये उमेदवारी अर्ज दाखल करतांना, महापालिकेचे देय असलेले विविध कर / चार्जेस / फी इत्यादी पोटी रक्कम थकीत असल्यास, उमेदवारी अर्ज अवैध होऊ शकतो.

याकरिता सर्व संबंधितांनी सदर विशेष नोटीस प्रसिध्द होताच विना विलंब / तात्काळ ठाणे महानगरपालिकेच्या संबंधित कार्यालयाकडे / नागरी सुविधा केंद्रामध्ये / विविध कर / चार्जेस / फी इत्यादी पोटी रक्कम / चालू मागणी इत्यादी जमा करावी, जेणेकरुन ठाणे महानगरपालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीकरिता उमेदवारी अर्ज सादर करतांना अथवा तत्सम कामकाजाच्या वेळी महापालिकेकडून संबंधितांस आवश्यक असणारा ‘ना हरकत दाखला’ विना विलंब शक्य होईल.

तरी संबंधितांनी त्वरीत महानगरपालिकेला विविध कर / चार्जेस / फी इत्यादी पोटी थकीत रक्कम महापालिकेकडे जमा करुन, निश्चिंत व्हावे.

Sd/-
( सुनील चव्हाण ) भा.प्र.से.
**अतिरिक्त आयुक्त (१)**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**

g:\ \notice letter - 21.12.2016.docx